# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक २४.०१.२०२३ मंगळवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे तहसिल :— खंडणी मागणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल**

**अ)** दिनांक ३०.१२.२०२२ चे ००.३० वा. चे दरम्यान फिर्यादी मोहम्मद सफर वल्द हाजी हैदर अली वय ५७ वर्ष, रा. लोधीपूरा, लालशाळे मागे, सुभानसेठ वाडा, नागपुर यांचा व आरोपी १) मोहम्मद आरीफ रंगुनवाला वय ७५ वर्ष २) हारिष आरिफ रंगुनवाला वय ३५ वर्ष ३) झैन तवक्कल वल्द मोहम्मद आरीफ वय ३२ वर्ष सर्व राहणार तवक्कल विला, काळबांडे हॉस्पीटल जवळ, जाफर नगर, गिट्टीखदान, यांचे सोबत जागेच्या कारणावरून वाद सुरू असुन मा. न्यायलयात त्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. याच कारणावरून आरोपी यांनी संगणमत करून घटने वेळी फिर्यादीचे पोलीस ठाणे तहसिल हद्दीतील भगवागड कंपाउंड, मोमीनपूरा येथील मुजीब फुटवेअर दुकानामध्ये येवुन फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करून "तुने मेरे खिलाफ पोलीस ठाणे मे रिपोर्ट क्यू दिया असे म्हणुन अभी के अभी दुकान खाली कर या १५ लाख रूपये दे" अशी खंडणी मांगुण "तुने पैसे नही दिये तो तुझे पिस्तोल कि गोली से मार दुगां" अशी धमकी दिली.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. ठाणे तहसिल येथे पोउपनि भवाळ ९९२२९९५७२६ यांनी आरोपी विरूध्द कलम ३८५, ३८७, ४४७, २९४, ५०६(ब), ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे. यातील आरोपी क्र. १ व २ यांना पो.ठाणे सदर येथील फसवणुक करून जबरी चोरीचे गुन्हयात दिनांक १९.०१.२०२३ रोजी अटक करण्यात आलेली होती. पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक ०७.१२.२०२२ चे २०.३० वा. चे दरम्यान फिर्यादी असद अली वल्द हिफाजत हुसैन वय ५३ वर्ष, रा. सादिकाबाद कॉलोनी, घर न. ९०, मानकापूर, नागपुर यांचा व आरोपी १) मोहम्मद आरीफ रंगुनवाला वय ७५ वर्ष २) हारिष आरिफ रंगुनवाला वय ३५ वर्ष ३) झैन तवक्कल वल्द मोहम्मद आरीफ वय ३२ वर्ष सर्व राहणार तवक्कल विला, काळबांडे हॉस्पीटल जवळ, जाफर नगर, गिट्टीखदान, यांचे सोबत जागेच्या कारणावरून वाद सुरू असुन मा. न्यायलयात त्यांचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. याच कारणावरून आरोपी यांनी संगणमत करून घटने वेळी फिर्यादीचे पोलीस ठाणे तहसिल हद्दीतील भगवागड कंपाउंड, मोमीनपूरा येथील क्राउन वॉच रिपेअर्स दुकानामध्ये येवुन फिर्यादीस अश्लिल शिवीगाळ करून तुने मेरे खिलाफ पोलीस ठाणे मे रिपोर्ट क्यू दिया असे म्हणुन "अभी के अभी दुकान खाली कर या १५ लाख रूपये दे" अशी खंडणी मांगुण "तुने पैसे नही दिये तो तुझे पिस्तोल कि गोली से मार दुगां" अशी धमकी दिली.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. ठाणे तहसिल येथे पोउपनि भवाळ ९९२२९९५७२६ यांनी आरोपी विरूध्द कलम ३८५, ३८७, ४४७, २९४, ५०६(ब), ४२७, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे. यातील आरोपी क्र. १ व २ यांना पो.ठाणे सदर येथील फसवणुक करून जबरी चोरीचे गुन्हयात दिनांक १९.०१.२०२३ रोजी अटक करण्यात आलेली होती. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सदर :— पळवुन नेवुन जबरीने दुखापत करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल**

फिर्यादी सिध्दार्थ संजय त्रिवेदी वय ३१ वर्ष, रा. फ्लॅट न. ३४५, न्यु कॉलोनी, सदर, नागपुर हे व आरोपी मोहम्मद झैन आरिफ रंगुनवाला वय ३२ वर्ष रा. काळबांडे हॉस्पीटल जवळ, जाफर नगर, गिट्टीखदान, दोघेही एकाच शाळेत शिकल्याने त्यांचात ओळखी होती व एकमेकांन सोबत पैसाची देवान घेवान करत होते. आरोपीने फिर्यादी कडुन

उधारीवर १ लाख रूपये दोन महीन्यात परत करणार या अटीवर घेतले होते. फिर्यादीचे वडीलांना अटॅक आल्याने त्यांनी आरोपीला पैसे परत मागीतले असता दिले नाही व "टाईम दिया है, जो करणा है कर ले" असे म्हटल्याने फिर्यादीने पैसे मागणे बंद केले. दिनांक २५.०६.२०२२ चे १७.०० वा. चे सुमारास पो.ठाणे सदर हद्दीत व्हीसीए ग्राउंड, सिव्हील लाईन, केक लिंक दुकाना समोर फिर्यादीला आरोपी दिसल्याने त्याने आरोपीला पैसे परत मांगीतले असता आरोपीने स्वत: जवळील पिस्तुल कढुन फिर्यादीचे कमरेला लावुन बळजबरीने त्यास चार चाकी वाहन क्र . एम.एच. ४९ यु १५४१ मध्ये बसवुन रेंन्ज ऑफीस सदर जवळ घेवुन गेला व फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करून "मेरी बदनामी कर राहा है, पैसे के बारे मे किसीको बताया तो, तुझे और तेरे परिवार को मार डालुंगा" असे म्हणुन फिर्यादीचे खिश्यातुन २५,०००/— रू व १० ग्रॅम ची अंगठी जबरीने काढुन फिर्यादीस बाहेर टाकुन पळुन गेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. ठाणे सदर येथे पोउपनि मस्के ९०६७३८४२५५ यांनी आरोपी विरूध्द कलम ३६३, ३२७, ५०४, ५०६, भादवि सहकलम ३/२५ भा.ह.का अन्वये गुन्हा नोंदविला आहे. यातील आरोपी यास पो.ठाणे सदर येथील या पुर्वीचे फसवणुक करून जबरी चोरीचे गुन्हयात दिनांक १९.०१.२०२३ रोजी अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे

**३) <u>पोलीस ठाणे गिट्टीखदान :— जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस अटक</u>**

दिनांक ११.०२.२०२२ चे ०६.०० वा ते दि. १५.११.२०२२ चे ०६.०० वा दरम्यान आरोपी राजदिप सिंह सतनाम सिंह सोहल वय २२ वर्ष रा. प्लॉट न. १११, बंसी नगर, हिंगणा नाका, नागपूर याने पो.ठाणे गिट्टीखदान हद्दीत राहणाऱ्या २२ वर्षीय पिडीता/ फिर्यादी सोबत ओळखीचा फायदा घेवुन तीला "तुझे सोबत लग्न करतो" असे म्हणुन तीचे सोबत सबंध वाढवुन तिचे फोटो नातेवाईक व मित्रांमध्ये दाखवुन बदनामी करण्याची धमकी देवुन तिचे सोबत जबरीने वेळोवेळी शरीरसबंध ठेवुन तीला गर्भवती करून तिचे ॲबोर्शन केले व लग्नास नकार दिला.

यापकरणी फिर्यादी हीने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे सपोनि देशमुख ९६६५०४०८२९ यांनी आरोपी विरूध्द कलम ३७६(२)(एन), ५०४, ५०६, ३२३, ४१७ भा.दं.वि. कायदा अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपीला अटक केले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**( अकस्मात मृत्यु )**

**१) <u>पोलीस ठाणे धंतोली</u> : —** पो. ठाणे धंतोली हद्दीत मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश, दिंडोशी, बोरीवली विभाग, मुंबई यांनी ५०६(२) भा.द.वी सहकलम ४ पोक्सो कायदा अन्वये ७ वर्षाची शिक्षा ठोठावीलेला व दि. ११.०५.२०२२ पासुन शिक्षा भोगत असलेला शिक्षा बंदी क्र. सी/११००६ नामे मोहम्मद ईकबाल नूर मोहम्मद खान वय ७० वर्ष याची प्रकृती खराब झाल्याने त्यास दि. १४.०१.२०२३ रोजी मेडीकल हॉस्पीटल येथे पाठवीले असता त्यास टिबी वार्ड येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान डॉक्टर फैजल मोहम्मद यांनी दि. २३.०१.२०२३ चे दुपारी १४.१५ वा मृत घोषीत केले. यापकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पो.ठाणे धंतोली येथे पोउपनि मादेवार ८९७५७३९२२५ यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

**(मिसींग)**

**<u>पोलीस ठाणे कळमणा</u> :—** सौ. प्रज्ञा गणेश शाहु वय २५ वर्ष रा. प्लॉट न. ५७, वैष्णोदेवी नगर, कळमणा, नागपुर ही दि. २१.०१.२०२३ चे ११.३० वा. सुमारास पो.ठाणे कळमणा हद्दीतुन राहते घरून कोणाला काहीही न सांगता निघुन गेली, परत आली नाही, मिसींग आहे, बेपत्ता आहे. शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** — रंग —सावळा, चेहरा — गोल, बांधा —मजबुत, केस — काळे, उंची— ५ फुट २ इंच, अंगात— जामनी रंगाची साडी घातलेली आहे. भाषा— हिंदी बोलते.



सौ.प्रज्ञा

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्रं. व कलम मधील खालील नमुद आरोपी हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. आरोपींनी नमुद तारखे पर्यंत न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ क्र | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५ वे सह दिवानी न्यायाधिश वरिष्ठ स्तर तथा अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०३०८७ /२०१३ | ४५४,४५७, ३८०, भा.द.वी | शिवा राज स्वामी रा. बिल्डींग न.४१/३११, सी.पी.डब्लु.डी क्वार्टर, पो.ठाणे गिट्टीखादान, नागपूर | ३१.०१.२०२३ |
| २. | मा. १५ वे सह दिवानी न्यायाधिश वरिष्ठ स्तर तथा अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०२३२४ /२००९ | ४२०, भा.द.वी | अरविंद कुमार राजनितीप्रसाद सिंन्हा रा. सी/१५, एम.एस.ई.बी कॉलोनी, आकार नगर, काटोल रोड, पो.ठाणे गिट्टीखदान, नागपूर | ०४.०२.२०२३ |
| ३. | मा. १५ वे सह दिवानी न्यायाधिश वरिष्ठ स्तर तथा अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०१७२४ /२०१० | ३८०, भा.द.वी | अरविंद बालचंद्र टेकाम रा. सुरेंन्द्रगड, गोंड मोहल्ला, पो.ठाणे गिट्टीखदान, नागपूर | ०८.०२.२०२३ |
| ४. | मा. १६ वे सह दिवानी न्यायाधिश वरिष्ठ स्तर तथा अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर | ३०४२११ /२००९ | ४/२५, भा.ह.का १३५ म.पो.का | अनमोल दगडुली कांबळे रा. दशरथ नगर, गिट्टीखदान, ह.मु रामेश्वरी, जोगी नगर, पो.ठाणे अजनी, नागपूर | २८.०२.२०२३ |

**(उमेश नासरे)**
**सहा. पोलीस निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर**

# आदेश

**विषय :— फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन 1973 कलम 144 (1)(3) प्रमाणे मनाई आदेश**

ज्याअर्थी, माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, नागपूर शहर आयुक्तालयातील बार, रेस्टारेंट, हॉटेल रात्री उशिरापर्यंत चालु ठेवतात व त्या ठिकाणी संगीत कार्यक्रम, मैफिली, डिजे पार्टी आयोजित करून मोठमोठयाने डी.जे वाजवुन धुमाकुळ करतात,

त्या मुळे आजुबाजुचे परीसरात राहणारे लोकांना त्रास होतो व अनोळखी व्यक्ती मुळे महिलांचे सुरक्षतेला धोका निर्माण होत असतो.

त्याअर्थी, मी **अमितेश कुमार, पोलीस आयुक्त नागपूर शहर**, विशेष फौजदारी दंड प्रक्रिया संहिता 1973 कलम 144 (1) (3) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून खालील आदेश देत आहे.

1) हॉटेल, बार, रेस्टारेंट, बॅक्वेट हॉल, लॉन, मोकळे मैदान व इतर ठिकाणी आयोजित संगीत कार्यक्रम, मैफिली, डी.जे पार्टी इत्यादी बाबत पोलीस आयुक्त कार्यालयाकडुन परवानगी घेणे आवश्यक आहे.

2) लॉन, मोकळे मैदान व इतर ठिकाणी आयोजित संगीत कार्यक्रम, डिजे इत्यादी रात्री 10.00 वा. बंद करणे आवश्यक आहे.

3) हॉटेल, बार, रेस्टारेंट, बॅक्वेट हॉल, लॉन, येथे कोणतीही संशयास्पद व्यक्ती तसेच भांडणाबद्दल त्वरीत पो.स्टे. किंवा 112 वर कळवावे.

4) हॉटेल, बार, रेस्टारेंट, बॅक्वेट हॉल, लॉन मालक यानी त्यांचे परीसरात सी.सी.टी.व्ही कॅमेरे चालु स्थितीत ठेवावे व त्यामधली रेकॉर्डीग कमीत कमी 15 दिवस सुरक्षित ठेवावी.

5) हॉटेल, बार, रेस्टारेंट, बॅक्वेट हॉल, लॉन, परीसरात वाहतुकीची कोंडी होता कामा नये तसेच वाहतुक नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

6) अग्निशामक संबंधाने आवश्यक सर्व मानदंडाचे पालन केले जात आहे याची खात्री करावी.

7) प्रतिष्ठान परिसरात मादक द्रव्य औषधी किंवा मानवी मनावर प्रभाव करणाऱ्या पदार्थाची विक्री होणार नाही.

8) परमीट रूम मध्ये क्षमतेपेक्षा जास्त लोकांना बसण्याची परवानगी देवु नये तसेच परमीट रूम मध्ये किती लोकांना बसण्याची परवानगी आहे या बाबतची माहीती दर्शनीय स्थळी लावावी.

9) बार, परमीट रूम मालकांनी अनिवार्य वेळेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

10) आपल्या प्रतिष्ठान मध्ये महिलांची सुरक्षा सुनिश्चीत करावी

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान 1860 चे कलम 188, अन्वये शिक्षेस पात्र राहील.

. सदरचा आदेश दिनांक 24/01/2023 रोजीचे 00.01 वा पासुन ते दिनांक 24/03/2023 चे 24.00 वा पर्यत लागु राहील.

सदर आदेश आज दिनांक 23/01/2023 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

**ठिकाण** :– नागपूर शहर
**शिक्का**:–

**(अमितेश कुमार)**
**पोलीस आयुक्त**
**नागपूर शहर**

# आदेश
## (कलम 33(1) आणि कलम 36 म.पो.का. अधिनियम–1951 प्रमाणे)

ज्या अर्थी माझ्या निदर्शनास असे आणून देण्यात आले आहे की, पोलीस आयुक्तालय नागपूर शहर कार्यक्षेत्रात दिनांक 25.01.2023 रोजी श्री गणेश जयंती, दिनांक 26.01.2023 रोजी प्रजासत्ताक दिन, दिनांक 28.01.2023 रोजी लाला लजपतराय जन्मदिन, रथ सप्तमी, दिनांक 30.01.2023 रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी, हुतात्मा दिन, दिनांक 05.02.2023 रोजी गुरू रविदास जयंती असे सण/उत्सव/दिन व कार्यक्रम साजरे होणार आहेत.

दिनांक 25.01.2023 रोजी 10.00 वा. चक्रधर स्वामी सेवा मंडळ नागपुर शहर तर्फे श्री गंगाधर देवाजी गोंधुळे यांचे नेतृत्वात वसंत पंचमी निमित्त सर्वज्ञ श्री चक्रधर प्रभुची पालखी यात्रा चिटणीसपार्क येथुन निघुन अग्रसेन चौक, गांधीगेट, महाल चौक, कल्यानेश्वर मंदिर, झेंडा चौक, लाकडी पुल, आजमशहा चौक, श्री दत्त मंदिर जुनि मंगळवारी, कापसी चौक, छापरूनगर चौक, राधाकृष्ण मंदिर, पारडी, नंतर भंडारा रोडने मौदा करिता प्रस्थान होणार आहे. सदर पालखी यात्रेत 50 ते 60 महिला पुरूष सह रणगाडे, भजन मंडळी सहभागी होतील.

दिनांक 25.01.2023 रोजी 08.00 वा. अखिल भारतीय महानुभाव मंडळ नागपुर शहर तर्फे श्रीमती तृप्ती बोरकर यांचे नेतृत्वात वसंत पंचमी निमित्त सर्वज्ञ श्री चक्रधर प्रभुची पालखी पदयात्रा श्री चक्रेश्वर मंदिंर भालदारपुरा येथुन निघुन अग्रसेन चौक, गांधीगेट, महाल चौक, कल्यानेश्वर मंदिर, झेंडा चौक, लाकडी पुल, आजमशहा चौक, श्री दत्त मंदिर जुनि मंगळवारी, गुजर चौक, छापरूनगर चौक, पारडी, नंतर भंडारा रोडने आसोली महालगाव करिता प्रस्थान होणार आहे. सदर पालखी यात्रेत 150 ते 200 महिला पुरूष सह रणगाडे, लेझीम पथक, सहभागी होतील.

दिनांक 26.01.2023 रोजी 09.15 वा. कस्तुरचंद पार्क मैदानावर 73 व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ होणार असुन मा. श्री देवेन्द्र फडणवीस, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांचे हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण होणार आहे. ध्वजारोहण नंतर परेड संचलनाचा कार्यक्रम होणार असुन त्या मध्ये नागपुर शहर, नागपुर ग्रामीण, राज्य राखीव पोलीस दल, पोलीस बॅंड पथक, व ईतर पथके सहभागी राहणार आहे. सदर कार्यक्रमा मध्ये प्रामुख्याने विभागीय आयुक्त नागपुर, जिल्हाधिकारी नागपुर, पोलीस आयुक्त नागपुर शहर, विविध विभागाचे शासकीय अधिकारी, नागपुर शहरातील लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरीक, स्वातंत्र संग्राम सेनानी, विद्यार्थी, पुरूष व महिला उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त नागपुर शहरात विविध सामाजिक, राजकीय संघटना व नागरिकाकडुन मिरवणुका, रॅली, प्रभातफेऱ्या, दौड स्पर्धा, प्रदर्शनी, सांस्कृतीक कार्यक्रम यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक 26.01.2023 रोजी आशुक शाह मासुक शाह दर्गा इसासनी खदान येथे एक ते दीड लाख भाविक दर्शना करीता येतात.

दिनांक 27.01.2023 रोजी हजरत बाबा ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्त मोठा ताजबाग व छोटा ताजबाग येथे मोठया प्रमाणात भविक दर्शना करीता येणार आहे.

दिनांक 27.01.2023 रोजी हजरत बाबा ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्त प्रादेशिक मनोरूग्णालय परीसरातील हजरत बाबा ताजुद्दीन दर्गा येथे 3 ते 4 हजार भविक दर्शना करीता येणार आहे.

दिनांक 06.02.2023 रोजी 06.30 ते 08.00 वा पर्यंत एच.सी.जी. कॅन्सर केयर हॉस्पीटल नागपुर यांचे वतीने श्री व्यंकटेशवारलु मारापाका (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांचे नेतृत्वात वर्ल्ड कॅन्सर दिना निमित्त जनजागृती करण्याचे उद्देशाने सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले आहे. सदर सायकल रॅली तेलंखेडी हनुमान मंदिर येथुन निघुन डब्ल्यु.सी.एल. मुख्यालय, जपानी गार्डन, काटोल नाका चौक, मानकापुर चौक, जरीपटका चौक, पावरग्रिड चौक, ऑटोमोटीव्ह चौक, परत एच.सी.जी. कॅन्सर सेंटर येथे येवुन समाप्त होईल. सदर रॅली मध्ये 50 ते 100 सायकल स्वार सहभागी होणार आहे.

सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, जनतेस गैरसोय उपद्रव वा नुकसान पोहचु नये या हेतुस्तव सार्वजनिक वाहतुक व ध्वनिक्षेपक वापराचे नियमन तसेच सार्वजनिक मिरवणुका व त्यामध्ये समाविष्ट होणाऱ्या लोकांच्या वर्तणुकीबाबत विनियमन करणे गरजेचे असुन पुढील विहीत कालावधीकरीता आवश्यक त्या उपाययोजना अमलात आणणे गरजेचे आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

मी **अश्वती दोर्जे, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 33 (1) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार जनतेस विहित कालावधीसाठी खालील प्रमाणे आदेश देत असून कलम 36 नुसार मला प्राप्त अधिकार मी पुढीलप्रमाणे सक्षम अधिकाऱ्यास प्रदान करीत आहे. त्यांचे आदेश पाळणे जनतेचे कर्तव्य राहील.
1) प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी हे एकाच पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात होणाऱ्या कार्यक्रमाची परवानगी देतील व एकाच परिमंडळात दोन पोलीस स्टेशन अंतर्गत होणाऱ्या कार्यक्रमाची परवानगी संबंधीत पोलीस उप आयुक्त देतील.
2) एका परिमंडळापेक्षा जास्त परंतु एकाच प्रभागात होणाऱ्या कार्यक्रमाची परवानगी संबंधीत अपर पोलीस आयुक्त नागपूर शहर हे देतील.
3) विहित कालावधीत प्रत्यक्ष कर्तव्य बजावणारे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना जनतेस निर्देश देण्याचे व नियमनाचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

➢ **<u>कलम 33(1) म.पो.का.</u>**

(ब) लोकास धोका, अडथळा किंवा गैरसोय न व्हावी म्हणुन व सार्वजनीक जागांवरील सर्व प्रकारच्या रहदारीचे विनियमन करणे व घोडयांवर, गाडयांवर, सायकलने किंवा पायी जाणाऱ्या व्यक्तींनी किंवा गुरे नेणाऱ्या किंवा त्यांच्या बरोबर असणाऱ्या व्यक्तींनी रस्त्यांच्या व सार्वजनिक जागांचा उपयोग करावयाचा त्यांच्या विनियमन करणे.

(क) वाहने रस्त्यांवर व सार्वजनिक जागांवर ज्या शर्तीवर उभी करून ठेवता येतील त्या शर्तीचे विनियमन करणे
व वाहने व जनावरे उभी करण्याच्या जागा म्हणुन रस्त्यांचा जो उपयोग करावयाचा त्याचे विनियमन करणे.
**(ड)(ब)** जे कोणतेही चिन्ह साधन किंवा प्रतिरूपण कोणत्याही रस्त्याच्या एखादया ठिकाणाहुन दिसण्यायोगे असेल आणि सदरहु नियमात किंवा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अशा उंचीवर (जवळची वाहतुक विचारात घेवून आणि त्या उंचीवरील असे चिन्ह साधन किंवा प्रतिरूपण लक्ष वेधून घेण्याचा किंवा अशा वाहतुकीस अडथळा आणण्याचा संभव आहे. हे विचारात घेवून) कोणत्याही जागेवर, इमारतीवर किंवा संरचणेवर उभारले असेल किंवा उंचावर धरले असेल, असे कोणतेही चिन्ह, साधन किंवा प्रतिरूपण जाहिरातीच्या प्रयोजनाकरिता उभारण्यात प्रदर्शीत करण्यास, बसविण्यास किंवा ते ठेवण्याचे लायसन्स देणे, त्यावर नियंत्रण ठेवणे किंवा मनाई करणे.
**(ह)** बंदुकीची दारू किंवा इतर कोणताही स्फोटक पदार्थ, रस्त्यामधुन किंवा सार्वजनिक जागांतुन वाहुन नेण्यासाठी लायसन्स देणे, त्यावर निर्बंध घालणे किंवा जवळपास राहणाऱ्यास किंवा जवळुन जाणाऱ्या लोकास अडथळा, गैरसोय, उपद्रव, धोका, भय किंवा नुकसान पोहचु नये म्हणुन असे पदार्थ रस्त्यामधून व सार्वजनिक जागांतुन वाहुन नेण्यास मनाई करणे.
**(न)** रस्त्यांमध्ये किंवा सार्वजनिक जागांमध्ये किंवा त्या जवळ गायन वादन करणे, वाद्य, ढोल, ताशे किंवा इतर वाद्य वाजविणे आणि शिंगे किंवा इतर कर्कश वाद्य वाजविणे याबाबत लायसन्स देणे, यावर नियंत्रण ठेवणे किंवा जवळुन जाणाऱ्या लोकांस अडथळा, गैरसोय, उपद्रव, धोका, भय किंवा नुकसान पोहचु नये म्हणुन त्यास मनाई करणे.

**(ओ)** जमाव व रस्त्यांतुन किंवा रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुका यातील व्यक्तींची वर्तणुक व वागणुक किंवा कृती याचे विनियमन करणे व मिरवणुकांच्या बाबतीत त्यांनी ज्या मार्गाने, पध्दतीने व ज्यावेळी जावे तो मार्ग, ती पध्दत व ती वेळ विहित करणे.
**(प)** रस्त्याच्या भागात कोणतीही दोरी अगर काठी आडवी टांगण्यास किंवा ठेवण्यास किंवा पुढे आलेला भाग किंवा संरचना उभारण्यास मनाई असून कोणीही व्यक्ती सार्वजनिक रस्त्यावर किंवा चौकावर इतर ठिकाणी सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण होईल किंवा निर्माण होण्याचा संभव होईल किंवा येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना अडथळा, गैरसोय, उपद्रव निर्माण होईल याप्रकारे कोणतेही असे कृत्ये ज्याद्वारे सभा मंडप, खांब, तोरणे, बॅनर, पताका, झेंडे उभारणार अथवा लावणार नाही. .

**(र)** पुढील गोष्टी करण्यास लायसन्स देणे, त्यावर नियंत्रण घालणे किंवा जवळपासच्या रहिवाशांना किंवा येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींना अडथळा, गैरसोय, उपद्रव, धोका, भय किंवा नुकसान पोहचु नये म्हणुन त्यास मनाई करणे.

1) त्याबाबत योग्य रितीने प्राधीकृत केलेले शासकिय कर्मचारी किंवा नगरपालिका अधिकारी याव्यतिरिक्त इतर व्यक्तींनी रस्त्यांवर किंवा सार्वजनिक जागांवर व त्या लगत असलेल्या इमारतीच्या बाहेरच्या बाजुस रोशनाई करणे.

2) कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या स्थानात ध्वनीक्षेपणाचा उपयोग करणे.

**(यु)** याबाबतीत तो जे वाजवी नियम करील त्या नियमास अधिन असेल त्या व्यतिरिक्त इतर रितीने कोणत्याही रस्त्यात किंवा इमारतीत किंवा कोणत्याही रस्त्यावर किंवा इमारतीवर किंवा कोणत्याही रस्त्यापासुन किंवा इमारतीपासून 50 फुटाच्या आत कोणतेही गवत किंवा इतर वस्तु पेटविणे किंवा जाळणे किंवा होळी पेटविणे किंवा कोणतेही अग्नीशस्त्र किंवा हवेच्या दाबाने उडणारी बंदुक (एअरगन) सैरपणे उडविणे किंवा दारूकाम
सोडणे किंवा फेकणे अगर फायर बलुन किंवा अग्नीबान सोडणे, उडविणे किंवा कोणताही खांब किंवा इतर वस्तु रस्त्यावर दिवे किंवा तशा प्रकारची रोशनाईचे इतर साधने लावण्यासाठी कोणत्याही रस्त्याच्या बाजुस ठेवणे किंवा रस्त्यावर आडवी बसविणे या गोष्टीस मनाई करणे.

➢ **<u>कलम 36 म.पो.का.</u>**

अ) रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणाऱ्या मिरवणूकीतील किंवा जमावातील लोकांनी कसे रितीने चालावे, त्यांची वर्तणूक कशी ठेवावी याबाबत त्याठिकाणी कर्तव्यावर उपस्थित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी दिलेले निर्देश पाळणे मिरवणुकीतील लोकांचे कर्तव्य असेल.

ब) अशा काढण्यात येणाऱ्या मिरवणुका हया कोणत्या मार्गाने जाव्यात किंवा जावू नयेत हया बाबी संबधित मिरवणुकीस परवानगी देणारे सक्षम प्राधिकारी ठरवतील.

क) सर्व मिरवणुकीच्या, जमावाच्या प्रसंगी व उपासनेच्या सर्व जागांच्या आसपास उपासनेच्या वेळी कोणत्याही रस्त्यावरुन, सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक स्थळी गर्दी होणार असेल किंवा अडथळा होण्याचा संभव असेल अशा सर्व प्रसंगी अडथळा होवू न देण्यासाठी त्याठिकाणी उपस्थित सक्षम प्राधिकारी जनतेस जे आदेश देतील ते पाळणे बंधनकारक राहील.

इ) कोणत्याही रस्त्यात, सार्वजनिक ठिकाणी,जागेत किंवा जागेजवळ वाद्य वाजविण्याचे,गाणे गाण्याचे, ढोल,ताशे व इतर वाद्य वाजविण्याचे आणि शिंगे व इतर कर्कश वाद्य वाजविण्याचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवणेसाठी परवानगी देणारे सक्षम प्राधिकारी हे आवश्यकतेनुसार अटी व नियम ठरवुन देतील व त्याप्रमाणे वागणे हे जनतेचे कर्तव्य असेल.

इ–अ) कोणत्याही सार्वजनिक जागेत, जागेजवळ किंवा कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या स्थानात ध्वनिक्षेपकाचा (लाउडस्पिकर) उपयोग करण्याचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचे संपुर्ण अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील व त्याचे पालन करणे जनतेस बंधनकारक असेल.

वरील आदेशाचे उल्लघंन करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 33 व 36 चे उल्लंघनाकरिता अनुक्रमे कलम 131 व 134 प्रमाणे कायदेशीर शिक्षेस पात्र राहील.

हा आदेश दिनांक **24.01.2023 चे 00.01** वा. पासून ते **07.02.2023 चे 24.00** वा.पर्यंत अंमलात राहील.

सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक 23.01.2023 रोजी जारी करण्यात आला.

## <u>आदेश</u>

### <u>(कलम 37 (1) (3) म.पो.का. अधिनियम – 1951 प्रमाणे)</u>

ज्या अर्थी माझ्या निदर्शनास असे आणून देण्यात आले आहे की, पोलीस आयुक्तालय नागपूर शहर कार्यक्षेत्रात दिनांक 25.01.2023 रोजी श्री गणेश जयंती, दिनांक 26.01.2023 रोजी प्रजासत्ताक दिन, दिनांक 28.01.2023 रोजी लाला लजपतराय जन्मदिन, रथ सप्तमी, दिनांक 30.01.2023 रोजी महात्मा

गांधी पुण्यतिथी, हुतात्मा दिन, दिनांक 05.02.2023 रोजी गुरू रविदास जयंती असे सण/उत्सव/दिन व कार्यक्रम साजरे होणार आहेत.

दिनांक 25.01.2023 रोजी 10.00 वा. चक्रधर स्वामी सेवा मंडळ नागपुर शहर तर्फे श्री गंगाधर देवाजी गोंधुळे यांचे नेतृत्वात वसंत पंचमी निमित्त सर्वज्ञ श्री चक्रधर प्रभुची पालखी यात्रा चिटणीसपार्क येथुन निघुन अग्रसेन चौक, गांधीगेट, महाल चौक, कल्यानेश्वर मंदिर, झेंडा चौक, लाकडी पुल, आजमशहा चौक, श्री दत्त मंदिर जुनि मंगळवारी, कापसी चौक, छापरूनगर चौक, राधाकृष्ण मंदिर, पारडी, नंतर भंडारा रोडने मौदा करिता प्रस्थान होणार आहे. सदर पालखी यात्रेत 50 ते 60 महिला पुरूष सह रणगाडे, भजन मंडळी सहभागी होतील.

दिनांक 25.01.2023 रोजी 08.00 वा. अखिल भारतीय महानुभाव मंडळ नागपुर शहर तर्फे श्रीमती तृप्ती बोरकर यांचे नेतृत्वात वसंत पंचमी निमित्त सर्वज्ञ श्री चक्रधर प्रभुची पालखी पदयात्रा श्री चक्रेश्वर मंदिंर भालदारपुरा येथुन निघुन अग्रसेन चौक, गांधीगेट, महाल चौक, कल्यानेश्वर मंदिर, झेंडा चौक, लाकडी पुल, आजमशहा चौक, श्री दत्त मंदिर जुनि मंगळवारी, गुजर चौक, छापरूनगर चौक, पारडी, नंतर भंडारा रोडने आसोली महालगाव करिता प्रस्थान होणार आहे. सदर पालखी यात्रेत 150 ते 200 महिला पुरूष सह रणगाडे, लेझीम पथक, सहभागी होतील.

दिनांक 26.01.2023 रोजी 09.15 वा. कस्तुरचंद पार्क मैदानावर 73 व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ होणार असुन मा. श्री देवेन्द्र फडणवीस, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपुर जिल्हा यांचे हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण होणार आहे. ध्वजारोहण नंतर परेड संचलनाचा कार्यक्रम होणार असुन त्या मध्ये नागपुर शहर, नागपुर ग्रामीण, राज्य राखीव पोलीस दल, पोलीस बॅंड पथक, व ईतर पथके सहभागी राहणार आहे. सदर कार्यक्रमा मध्ये प्रामुख्याने विभागीय आयुक्त नागपुर, जिल्हाधिकारी नागपुर, पोलीस आयुक्त नागपुर शहर, विविध विभागाचे शासकीय अधिकारी, नागपुर शहरातील लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरीक, स्वातंत्र संग्राम सेनानी, विद्यार्थी, पुरूष व महिला उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त नागपुर शहरात विविध सामाजिक, राजकीय संघटना व नागरिकाकडुन मिरवणुका, रॅली, प्रभातफेऱ्या, दौड स्पर्धा, प्रदर्शनी, सांस्कृतीक कार्यक्रम यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे दिनांक 26.01.2023 रोजी आशुक शाह मासुक शाह दर्गा इसासनी खदान येथे एक ते दीड लाख भाविक दर्शना करीता येतात.

दिनांक 27.01.2023 रोजी हजरत बाबा ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्त मोठा ताजबाग व छोटा ताजबाग येथे मोठया प्रमाणात भविक दर्शना करीता येणार आहे.

दिनांक 27.01.2023 रोजी हजरत बाबा ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव मोठया प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्त प्रादेशिक मनोरूग्णालय परीसरातील हजरत बाबा ताजुद्दीन दर्गा येथे 3 ते 4 हजार भविक दर्शना करीता येणार आहे.

दिनांक 06.02.2023 रोजी 06.30 ते 08.00 वा पर्यंत एच.सी.जी. कॅन्सर केयर हॉस्पीटल नागपुर यांचे वतीने श्री व्यंकटेशवारलु मारापाका (मुख्य कार्यकारी अधिकारी) यांचे नेतृत्वात वर्ल्ड कॅन्सर दिना निमित्त जनजागृती करण्याचे उद्देशाने सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले आहे. सदर सायकल रॅली तेलंखेडी हनुमान मंदिर येथुन निघुन डब्ल्यु.सी.एल. मुख्यालय, जपानी गार्डन, काटोल नाका चौक, मानकापुर चौक, जरीपटका चौक, पावरग्रिड चौक, ऑटोमोटीव्ह चौक, परत एच.सी.जी. कॅन्सर सेंटर येथे येवुन समाप्त होईल. सदर रॅली मध्ये 50 ते 100 सायकल स्वार सहभागी होणार आहे.

उपरोक्त प्रस्तावित उत्सव व कार्यक्रम काळात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी **अश्वती दोर्जे, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये संपुर्ण पोलीस आयुक्तालय नागपूर शहर कार्यक्षेत्र हद्दीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था तसेच सुरक्षितता ठेवण्याकरिता खालीलप्रमाणे मनाई आदेश जारी करीत आहे.

या आदेशाद्वारे विहित कालावधीत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती विना परवाना एकत्र जमण्यास व एकत्र येवुन खालील कृत्य करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**1.(अ)** शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

**(ब)** कोणताही क्षारक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

**(क)** दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधणे बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

**(ड)** व्यक्तींचे किंवा प्रेते किंवा आकृती किंवा त्याच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे

**(ई)** सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे.

**(फ)** सभ्यता, अगर निती यास विरुध्द असतील अशी किंवा राज्याची शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यांच्यामुळे राज्य शासन उलथुन पाडण्याचा संभव आहे असे अशा प्राधिकाऱ्यास वाटेल अशी आवेशपुर्ण भाषणे करणे, हावभाव करणे अगर सोंग आणणे आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तु तयार करणे किंवा त्यांचा लोकात प्रसार करणे.

**3.(1)** सक्षम अधिकाऱ्याच्या मते सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी कोणत्याही जमावास किंवा मिरवणुकीस जेव्हा जेव्हा व जितक्या मुदतीपर्यंत मनाई करणे आवश्यक असेल तेव्हा ते लेखी आदेश देवून त्याद्वारे, तितक्या मुदतीपर्यंत तितकी मनाई करण्यात येईल. या आदेशाचे कोणी उल्लंघन केल्यास सदरची व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 135 प्रमाणे कायदेशीर शिक्षेस पात्र राहील. हा आदेश सरकारी किंवा निमसरकारी नोकरीत असणाऱ्या ज्यांना अधिकार बजाविण्याचे संदर्भात उपनिर्दिष्ट बाबी हाताळाव्या लागतात. अशा व्यक्तीस, तसेच खाजगी सुरक्षा व्यवस्थेत असलेले पहारेकरी, गुरखा, चौकीदार यांना लागू होणार नाही तसेच लग्न समारंभ, प्रेतयात्रा, धार्मीक सण यांना देखील लागू होणार नाही.

हा आदेश दिनांक **24.01.2023 चे 00.01** वा. पासून ते **07.02.2023 चे 24.00** वा. पर्यंत अंमलात राहील. सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक 23.01.2023 रोजी जारी करण्यात आला आहे.

**ठिकाण :—** नागपूर शहर.

**शिक्का**

**(अश्वती दोर्जे)**
**सह पोलीस आयुक्त,**
**नागपूर शहर**